महाराष्ट्र शासन

# उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे कार्यालय, अलिबाग

"वक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" मु.पो.हिराकोट तलावाजवळ अलिबाग ता.अलिबाग जि.रायगडपी .नं. 402 201
दूरध्वनी क्र 02141-222016/222216 Email ID:dycfalibag@mahaforest.gov.in

जावक क्रमांक:ब/20/जमिन/व.सं.1228 /2022-23. दिनांक:29 /06/2022

प्रति,

कार्यकारी अभियंता,
एम. एम. आर. डी. ए.
बांद्रा- कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा पुर्व, मुंबई

विषयः- **वन जमिन रायगड.**
Diversion of 2.0847 Private Forest land thereof for Non-Forest activity in Village Jasai tal Uran District Raigad in Maharashtra.

संदर्भः- 1) आपलेकडील पत्र क्र. MMRDA/MTHL-PIU/Pac-3/Forest Land/1144/2022, दिनांक 22/04/2022.
2) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/व.सं/770, दिनांक 27/05/2022.
3) आपलेकडील पत्र क्र. MMRDA/MTHL-PIU/Pac-3/Forest Land/1238/2022, दिनांक 10/06/2022.
4) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/व.सं/979, दिनांक 15/06/2022.

संदर्भिय पत्रान्वये विषयांकित वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला होता. सदर प्रस्तावांत असणा-या त्रुटी या कार्यालयाकडील संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये आपणास कळविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार आपणाकडून संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये पुर्तता करुन सुधारीत प्रस्ताव या कार्यालयास एक प्रतीत सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्तावांची छाननी केली असता त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहे.

1) सुधारीत प्रस्तावात मागणी क्षेत्र 1.00 हे. वनक्षेत्रापेक्षा जास्त होत असल्याने पर्यायी वनीकरणासाठी वनेतर क्षेत्राचा तपशिल जसे टोपोशिट, गावनंकाशा, जिओ डिजीटल नकाशा, केएमएल फाईल, पर्यायी वनीकरण योजना, सदर पर्यायी वनीकरणासाठी उपयुक्त असलेबाबत संबंधित उपवनसंरक्षक यांचे प्रमाणपत्र, वनेत्तर क्षेत्राचे 7/12 व फेरफार इ. प्रस्तावात प्रस्ताव वरीष्ठांकडे सादर करणेपूर्वी समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

2) सुधारीत प्रस्तावांचे संचामध्ये **Index Map**-टोपोशीट मॅप सामील केलेला दिसून येत नाही. तरी विहित प्रमाणातील **Index Map** प्रस्तावांत सामील करणेत यावा.

3) सुधारीत प्रस्तावांचे संचामध्ये प्रसतावावर स्वाक्षरीकर्ता हयांचा कार्यालयीन मोहोर त्यांचे प्रत्येक स्वाक्षरीचे ठिकाणी उमटविण्यात यावी.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पूर्तता करुन सुधारीत प्रस्ताव आवश्यकत्या दस्तऐवजासह आठ प्रती या कार्यालयास सादर करणेत यावा. तसेच सदर प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीवर देखील या कार्यालयाचे स्तरावर सादर करणेत यावा. सोबत प्रस्तावाचे संच परत करणेत येत आहेत.

(आशिष ठाकरे, भा.व.से.)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

सहपत्रः- वरील प्रमाणे.

प्रतः- सहाय्यक वनसंरक्षक, पनवेल व वन परिक्षेत्र अधिकारी, उरण यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

2/- वन परिक्षेत्र अधिकारी यांनी वनक्षेत्रांत वृक्षतोड होणार आहे अगर कसे याबाबत खात्री करुन जर वृक्षतोड होणार असेल तर बाधीत होणारे वृक्षांचे यादीसह वृक्षतोडीचे अंदाजपत्रक आंग्ल भाषेत भाषांतरीत करुन आठ प्रती अंदाजपत्रक सहा. वनसंरक्षक, पनवेल यांचेमार्फत या कार्यालयास सादर करावा. तसेच प्रस्तावित वनक्षेत्रात प्रकल्प यंत्रणेकडून वनभंग झाला आहे अगर कसे याबाबत अहवाल सहा. वनसंरक्षक, पनवेल यांचेमार्फत आवश्यकत्या दस्तऐवजासह सादर करावा.

प्रतः वनक्षेत्र सर्व्हेक्षक, विभागीय कार्यालय, अलिबाग यांना माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.